ग्रंथालय संचालनालयाच्या अंतर्गत
राजपत्रित गट ब अधिका-यांच्या
प्रशासकीय बदल्यांबाबत....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन आदेश क्रमांक -मराग्रं-२०१८/प्र.क्र.८९/२०१८/साशि-५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २९ मे, २०१८

वाचा-१. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१७ प्र.क्र.४१५/ कार्यासन १२ दि. ०९ एप्रील,२०१८

आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हे दिनांक ०१ जुलै, २००६ पासून अमलात आले आहे. सदर अधिनियमाच्या कलम ६ नुसार बदली करण्यास सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आले आहेत.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व नियम ४ (५) मधील तरतुदीस अनुसरुन प्रशासकीय कारणास्तव पुढील अधिकाऱ्यांच्या बदलीचा प्रस्ताव नागरी सेवा मंडळासमोर सादर करण्यात आला होता. नागरी सेवा मंडळाच्या शिफारशीस अनुसरुन सक्षम प्राधिका-यांनी दिलेल्या मान्यतनुसार खालील विवरणपत्रात नमूद अधिका-यांची बदलीने त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

अनु.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	सध्याचे कार्यालय	बदली नंतरचे पदनाम व कार्यालय
१	२	३	४
१	श्रीमती ऊ.सु.लोंढे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी	जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, पुणे	जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सांगली
२	श्री.अ.मा.गाडेकर, सहाय्यक ग्रंथालय संचालक	सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद	जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, अहमदनगर.
३	श्रीमती श्रे.श्री.गोखले, जिल्हा ग्रंथालय अधिकारी	जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग	जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, पुणे.
४	श्री. सु.सं.हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी	जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, नांदेड	सहाय्यक ग्रंथालय संचालक, सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय, औरंगाबाद.

३. सदर अधिका-यांनी त्यांच्या नविन पदाचा पदभार त्वरीत स्विकारावा तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीडीआर/१०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३० ऑगष्ट, १९९२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सूचना लक्षात घेऊन बदली रद्द करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाचे आवेदन सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठरतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी या आदेशाप्रमाणे सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या सद्याच्या पदभारातून तात्काळ कार्यमुक्त करावे. व बदली झालेले अधिकारी विहित कालावधीत दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होतील याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०५२९१८३५५००१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. वरील आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुससार व नावाने

Anil Vithalrao Saware

Digitally signed by Anil Vithalrao Saware
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, cn=Anil Vithalrao Saware
Date: 2018.05.29 18:39:57 +05'30'

(अनिल वि. सावरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (उवतंशि) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (उवतंशि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. प्रधान सचिव (उवतंशि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई
७. महालेखापाल (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र मुंबई
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/सांगली/औरंगाबाद/अहमदनगर/सिंधुदुर्ग/नांदेड
९. निवड नस्ती (साशि-५) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.